# मुद्रकांचे सक्षमीकरण



**किशोर सुरती**
मुख्य सल्लागार
एस पी कन्सल्टन्सी, मुंबई

मुद्रण व्यवसायात वेगाने तांत्रिक परिवर्तन होत आहे हे तर सर्वश्रुतच आहे. विविध स्तरांवरील ग्राहकांच्या मागणीत कोविड नंतर अनिश्चितता निर्माण झाली ही पण वस्तुस्थिती आहे. मुद्रण व्यवसायिक विविध कामाचे स्वरुप आणि पातळींवर त्यांच्या क्षमतेनुसार कामगिरी करत आहेत परंतु असे लक्षात आले आहे की बहुसंख्य मुद्रक भविष्यकालीन अनिश्चितता आणि व्यवसायाच्या अपेक्षित वाढीबाबत चिंतीत आहेत. आपला व्यवसाय वैश्विक स्तरावर सातत्याने होत असलेल्या बदल आणि ग्राहकांच्या बदलत्या निवडीच्या स्वरुपामुळे प्रभावीत होत आहे हे मान्य करणे क्रमप्राप्त आहे. वर्तमान काळात विविध माध्यमांमार्फत जागतिक पातळीवर घडणारे बदल आणि नाविन्यपूर्णरित्या प्रदर्शित होत असलेल्या कलात्मक कृती ह्या सर्वांना ज्ञात झाल्यामुळे मुद्रण क्षेत्रातून दिल्या जाणाऱ्या पारंपारिक सेवेपासून त्यांची अपेक्षा सातत्याने वाढत आहे. त्यामुळे ग्राहक केंद्रीत सेवा उपलब्ध करून देण्यासाठी मुद्रण व्यवसायात विविध स्तरांवर बदल घडविणे आवश्यक आहे. सदर वस्तुस्थिती आपल्या व्यवसायासाठी सशर्तपणे मोठ्या प्रमाणात मुद्रण साहित्याची मागणी निर्माण करीत आहे. खरे तर वाढत्या दर्जेदार मुद्रीत सामुग्रीची व्याप्ती आपल्यासाठी सुवर्णसंधी आहे हे मान्य करावे लागेल.

मुद्रकांच्या विविध संस्थांकडून व्यवसायाच्या उत्कर्षासाठी गांभीर्याने प्रयत्न केले जात असले, तरी ही वस्तुस्थिती आहे ज्या मुद्रकांनी ह्या संधीचा उपयोग करुन भविष्यातील बाजाराच्या कलाची जाणीव करुन घेतली आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी ज्यांनी आधीच तयारी केली होती म्हणून ते आज इतरांपेक्षा स्वतःला पुढे ठेवू शकले आहे हे मान्य करावे लागेल. बहुसंख्य मुद्रकांना सध्या बदलत्या व्यावसायीक घडामोडीची जाणीव करुन पुढील आव्हाने स्वीकारुन भविष्यात उपलब्ध होणाऱ्या बाजारपेठेत ब्रॅण्डिंग निर्माण करण्यासाठी लागणाऱ्या सर्व तांत्रिक आणि व्यवसायिक मार्गदर्शन करणे हे आमचे प्रमुख कार्य आहे. खरे तर ह्या वाढत्या दर्जेदार मुद्रीत सामुग्रीची व्याप्ती आपल्यासाठी सुवर्णसंधी आहे हे मान्य करावे लागेल.

बदलत्या तंत्रज्ञानाचा स्वीकार न करणाऱ्या कोणत्याही व्यवसायाला धक्का बसुन सदर व्यवसाय बंद करावा लागतो, ही वस्तुस्थिती आहे. आज आपण सर्वजण अशाच परिस्थितीचा सामना करत आहोत. तेव्हा मला माझ्या मुद्रण व्यावसायिक बांधवांना वेळीच सावध करुन व्यवसाय वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा पध्दतशीरपणे अवलंब करण्यासाठी अनुभवी व सिध्द सल्लागारांच्या मार्गदर्शनाखाली भविष्याचा आराखडा तयार करावा असे आवाहन करण्यात येत आहे.

मुद्रक समुदायाशी सामान्य चर्चा करताना हे देखील लक्षात आले आहे की ते व्यवसायाच्या भवितव्याबाबत चिंताग्रस्त आहेत. अपूर्ण माहिती हे अशा प्रकारच्या भीती निर्माण करतात. मुद्रण सल्लागार आणि मुद्रकांचे हितचिंतक या नात्याने मला आपल्या व्यापाराची वस्तुस्थिती अधोरेखित करायची आहे. सर्व थरावतील मुद्रकांना उद्योग वाढीकरीता जागृत करून, सकारात्मक मार्गदर्शनाद्वारे शिक्षित आणि सक्षम करणे हे आमचे प्रमुख ध्येय आहे.

आता तुम्हाला आश्चर्य वाटेल की वर उल्लेख केलेल्या गोष्टी कशा शक्य आहेत ?

एस पी कन्सल्टन्सीचे प्रमुख सल्लागार श्री. किशोर सुरती हे प्रिंटींग टेक्नॉलॉजिस्ट आहेत, ४० वर्षांहून अधिक काळाचा त्यांचा तांत्रिक आणि प्रशासकीय अनुभव तुम्हाला तुमच्या व्यावसायिक भविष्याच्या चिंतेतून बाहेर येण्यास मदत करण्यासाठी तयार आहे. तसेच अनुभवी तांत्रिक टिम तुमच्या सर्व समस्या समजून, सखोल चर्चा करुन, सर्व प्रकारच्या नकारात्मक विचारांतून बाहेर पडण्यासाठी काम करतील. तसेच बाजारात तुमचे ब्रॅंड नेम तयार करण्याच्या हेतूने आपली क्षमता व त्रुटी यांचे मूल्यमापन करुन आपल्या व्यवसाय सामर्थ्याची वाढ करण्यासाठी आम्ही कटिबध्द आहोत.

ह्या लेखाच्या अनुषंगाने अधिक स्पष्टिकरण आवश्यक असल्यास आपण निःसंकोचपणे आम्हांस संपर्क साधू शकता.


मो. नं. ९८६९०१६७६२ / ८७७९६२८८८०
www.spkonsultancy.com
info@spkonsultancy.com



**द्रुपाच्या या प्रदर्शनाला ज्या मुद्रक संघांना अथवा वैयक्तिक यायचे असेल संबंधित मुद्रकांनी महाराष्ट्र मुद्रण परिषदेचे अध्यक्षांची खालील नंबरवर २० जानेवारी २०२४ पर्यंत संपर्क साधावा जेणेकरुन पुढील नियोजन करता येईल. असे आवाहन त्यांनी केले आहे.**

**बाळासाहेब आंबेकर** अध्यक्ष, महाराष्ट्र मुद्रण परिषद

Mob.: 9423807676 / 8275662277, E-mail : balambekar@gmail.com